**जलसंपदा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सीडीए-१०१५/(२६/१५)/लाक्षेवि(कामे)**

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक: १२ मार्च, २०१५

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७,दि. ५/१२/२०१४.

२) शासन निर्णय क्रमांकः बीकेएस २००५/(१९/२००५)/सिंव्य (धोरण), दि. २२/०६/२००५

३) शासन निर्णय क्रमांकः सीडीए-१०१५/(२६/१५)/लाक्षेवि (कामे), दि.३१/१/२०१५

प्रस्तावना :-

राज्यात सतत उद्भवणारी टंचाई सदृश परिस्थिती विचारात घेता "सर्वांसाठी पाणी - टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९" अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत टंचाईग्रस्त गावांची निवड करुन त्या ठिकाणी भविष्यात पाणी टंचाई परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून आवश्यक कामे करण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत पावसाचे पाणी शिवारातच अडविणे, भुगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करणे, जलस्रोतामधील गाळ काढणे, अस्तित्वात असलेल्या जलस्रोताची साठवण क्षमता पुन:र्स्थापित करणे इत्यादी कामे करण्यात येतात. ही कामे जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. बीकेएस -२००५/ (१९/२००५)/सिंव्य (धोरण), दि. २२/०६/२००५ या शासन निर्णयामुळे मर्यादीत क्षेत्रात करणे शक्य होते.

महाराष्ट्र राज्याच्या सन २००३ च्या जलनीतीनुसार नदीखोरे/ उपखोरे हा घटक विचारात घेऊन जलसंपत्तीचे नियोजन, विकास व व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक व बहुक्षेत्रीय दृष्टीकोन ठेवून करण्याचे नमूद आहे. त्यानुसार सिंचनासाठीचा पाणी पुरवठा जेथे अनियमित व अपुरा आहे तेथे, आवश्यकतेनुसार पूर्ण झालेल्या मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात जलसंवर्धनाची कामे जसे की, गावतळी, पाझर तलाव, को. प. बंधारे, हाती घेण्यात यावीत असे स्पष्ट केले आहे. त्यास अनुसरुन जलयुक्त शिवार अभियानांतर्गतची कामे जलसंपदा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात घेण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय: -**

जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक ५/१२/२०१४ नुसार जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे जलसंपदा विभागाच्या मोठया, मध्यम व लघु प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातसुध्दा जेथे सिंचनासाठीचा पाणी पुरवठा अनियमित व अपुरा आहे व ज्या

ठिकाणी निस्सारण योग्य जमिनी आहेत, अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३१२११०५५८१८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samadhan Kondiba Sabbinwar

Digitally signed by Samadhan Kondiba Sabbinwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Superintendent Engineer And Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samadhan Kondiba Sabbinwar
Date: 2015.03.12 11:16:07 +05'30'

**( स.को.सब्बीनवार )**

उप सचिव

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,

३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

४. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,

५. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य,

६. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

७. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,

८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

९. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई,

१०.प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

११.सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

१२.सचिव (जलसंधारण), जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,

१३.सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,

१४.महासंचालक, जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद,

१५.महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा), नाशिक,

१६.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१,

१७.सर्व विभागीय आयुक्त,

१८. संचालक (मृद संधारण) , कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१,

१९.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२०.सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,

२१.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

२२.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे,

२३.मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर,

२४.संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,

२५.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,

२६.मुख्य कार्यकारी अधिकारी / अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,

२७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता),

२८. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,

२९.सर्व जिल्हाधिकारी,

३०.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

३१.महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता),

३२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

३३.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

३४.सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,

३५.सर्व विभागीय कृषि सहसंचालक,

३६.सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,

३७.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,

३८. सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग,

३९.सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),

४०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

४१.सर्व मंत्रालयीन विभाग,

४२.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई,

४३.नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

४४.लाक्षेवि (कामे) कार्यासन संग्रहार्थ.